आरोग्य पथक, पालघर या संस्थेस यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण विभाग,

शासन शुद्धिपत्रक, क्रमांक : यंत्रख-२०२५/प्र.क्र.४४३/प्रशा-१,

गोकुलदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,

९ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.

दिनांक : २१ ऑगस्ट, २०२६

वाचा : १. समक्रमांक शासन निर्णय दिनांक : ०५.०९.२०२५.

२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक : DMER-२२०११/५७/२०२५-PROC१, दिनांक : २८.०७.२०२५.

३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक : DMER-२२०११/२३६/२०२६-PROC१, दिनांक : २९.०७.२०२६.

प्रस्तावना:

विभागाच्या अधिनस्त कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई या संस्थेस Modular casualty room with OT on turnkey basis स्थापन करण्यास संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, संचालनालयाने, सदर प्रशासकीय मान्यतेमधील कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई या संस्थेमध्ये सदर यंत्रासामुग्री स्थापित करण्यास तांत्रिक कारणांमुळे शक्य नसल्याकारणाने सदर यंत्रसामुग्री कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई ऐवजी आरोग्य पथक, पालघर या संस्थेत स्थापित करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक निर्गमित करण्याचे शासन विचाराधिन होते.

शासन शुद्धिपत्रक :-

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील Modular casualty room with OT on turnkey basis ही यंत्रसामुग्री कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई या संस्थे ऐवजी आरोग्य पथक, पालघर या संस्थेत स्थापित करण्यात यावी.

२. तसेच शासन निर्णयात नमूद सन २०२५-२६ ऐवजी सन २०२६-२७ असे वाचण्यात यावे.

३. सदर शुद्धिपत्रक खालील अटींच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे:-

१. मूळ निविदेतील तांत्रिक specifications, quantity, scope of supply, पुरवठादार व मंजूर किंमत रु.१४,५०,००,०००/- मध्ये कोणताही बदल करता कामा नये.

२. सदर बदलामुळे शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याची संचालनालयाने खात्री करावी.

३. यंत्रसामुग्रीची स्थापना, commissioning व turnkey scope मधील इतर सर्व बाबी मूळ कराराच्या अटी व शर्तीनुसारच पूर्ण कराव्यात.

४. सदर यंत्रसामुग्रीचे स्थलांतर/स्थापना करताना शासनाच्या मालमत्तेची सुरक्षितता, वाहतूक, विमा, warranty/guarantee व इतर करारातील जबाबदाऱ्या अबाधित राहतील याची दक्षता घ्यावी.

५. आरोग्य पथक, पालघर येथे आवश्यक वैद्यकीय व अवैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची कार्यवाही ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे. जे. समूह रुग्णालये, मुंबई यांनी करावी.

६. Modular OT पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक Senior Resident पदस्थापनेबाबत स्वतंत्रपणे आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

७. सदर सुविधा कार्यान्वित झाल्यानंतर तिचा प्रभावी वापर होईल व शासनाच्या खर्चातून उपलब्ध करून दिलेली यंत्रसामुग्री निष्क्रिय राहणार नाही, याची जबाबदारी संबंधित संस्थेने सुनिश्चित करावी.

४. सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२१११२३२२९३५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR JAYA SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b8240 6eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8 EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF111 1D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2026.08.21 13:14:25 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.
२) महालेखाकार - १ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई
५) अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर. ज. जी. समूह रुग्णालय, मुंबई
६) अधिक्षक, कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई.
७) सहयोगी प्राध्यापक, आरोग्य पथक, पालघर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखाधिकारी, मुंबई
११) निवडनस्ती (प्रशा-१)